४

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): कोल्हापुर **P.S.**(ठाणे): इचलकरंजी **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0246 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 13/08/2022 01:17 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार
**Time Period** (कालावधी):
**Date From** (दिनांक पासून): 12/08/2022
**Date To** ( दिनांक पर्यंत): 12/08/2022
**Time From** (वेळेपासून): 14:47 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 16:52 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 12/08/2022 **Time** (वेळ): 23:55 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
**Entry No.** (नोंद क्र.): 031 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 12/08/2022 23:58 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 2 किमी
**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): लालबहादुर शास्त्री सभागहाचे बाज,जुनी नगरपरिषद इचलकरंजी, इचलकरंजी,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अशोककुमार बाळासाहेब माने

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : बाळासाहेब माने

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1964 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):



Scanned by TapScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घरनं 1055,जवाहरनगर इचलकरंजी,हातकणंगले,इचलकरंजी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घरनं 1055,जवाहरनगर इचलकरंजी,हातकणंगले,इचलकरंजी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9657119666

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाबासाहेब आण्णा माळी | | वडील का नाम : आण्णा माळी | 1. लक्ष्मीनगर,रुकडी,हातकणंगले, इचलकरंजी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1000/ रूपये | 1,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 1,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक - 12/08/2022 मी श्री.अशोककुमार बाळासाहेब माने, वय-58 वर्ष, व्यवसाय-नोकरी,शाखाअभियंता इचलकरंजी महानगरपालीका इचलकरंजी,रा.वार्ड 21,घर नं 1055 जवहारनगर इचलकरंजी,ता.हातकणंगले जिल्हा कोल्हापुर,मो.नं.9657119666 आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर माझे कुटुंबासह एकत्रीत रहाणेस आहे. मी इचलकरंजी महानगरपालीका इचलकरंजी येथे अभियंता म्हणुन काम करतो,इचलकरंजी महानगरपालीका इचलकरंजी मधील बाबासाहेब माळी हे लिपीक म्हणुन पाणीपुरवठा विभागात नेमणुकीस आहेत ते यापुर्वी ऑडीट विभागामध्ये कार्यरत होते. त्यावेळी ते कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे मेडीकल बिलाचे ऑडीट करीत होते. त्यामुळे ते सध्या पाणीपुरवठा विभागात कार्यरत असुनसुध्दा कार्यालयातील अधिकारी किंवा कर्मचारी यांचे मेडीकल बिलाचे ऑडीट पडताळणीचे कामे करून देतात. माझी आई श्रीमती गंगुबाई बाळासो माने हीचा माहे 4-2022 मध्ये अपघात झाला होता तिचे ऑपरेशन मी अँस्टर आधार कोल्हापुर येथे केले होते. त्या ऑपरेशनचे बिलाचे पैसे मी महानगरपालिकेचा कर्मचारी असल्याने मला परत मिळतात त्या करीता मी सदरचे बिल तयार करून आमचे इचलकरंजी महानगरपालीका विभाग येथे असले आरोग्य विभाग येथे सादर केले होते सदरचे बिल हे त्यानंतर सीपीआर हस्पीटल कोल्हापुर येथे पाठविण्यात आले तेथुन सदरचे बिल मंजुर होवुन आमचे इचलकरंजी महानगरपालीका विभागातील आरोग्य विभागामध्ये आले त्यांनी सदरचे बिल तपासणीकरीता लिपीक बाबासाहेब माळी यांचेकडे पाठविले होते त्यांनी माझे आईची मेडीकल बिलाची फाईल तपासुन त्यामधील त्रुटी काढून अपुरे असलेली कागदपत्रे त्यांनी माझेकडे मागणी करून घेतली व बिलाचे पडताळणी करून फायनल बिल तयार केले व ते पुढे मंजुरीकरीता पाठविण्यासाठी बिलाची फाईल दि.11.08.2022 रोजी माझेकडे दिली त्यावेळी त्यांनी माझेकडे मी तुमचे आईचे मेडीकल बिलाची फाईल विनात्रुटी पडताळणी करून दिली आहे आता मेडीकल बिलाचे मंजूरीसाठी कुठे अडचण येणार नाही असे म्हणुन माझेकडे 1000/-रूपयाची मागणी केली.त्यांनी मला आज दि.12/08/2022 रोजी इचलकरजी महानगरपालीका येथे भेटायला बोलाविले आहे. बाबासाहेब माळी, लिपीक इचलकरंजी महानगरपालीका इचलकरंजी हे माझे आईचे मेडीकल बिल पडताळणी करून देणेच्या मोबदल्यात माझेकडे मागत असलेले पैसे हे लाच म्हणूनच मागणी करीत असलेची मला खात्री झाली आहे. परंतू बाबासाहेब माळी,लिपीक इचलकरंजी महानगरपालीका यांना लाच देणेची माझी ईच्छा नसलेने मी दि. 12/08/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथील पोलीस उप अधीक्षक श्री बुधंवत साहेबांना त्यांचे मोबाईलवरती फोन केला त्यावेळी मी माझी वरीलप्रमाणे थोडक्यात तक्रार सांगुन कारवाई करण्याची विनंती केली. तेव्हा बुधवंत साहेबांनी त्यांचेकडील अधिकारी मला संपर्क करतील व पुढील सुचना देतील असे सांगितले. त्याप्रमाणे अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर विभागाचे पोलीस निरीक्षक नितीन कुंभार यांनी माझेशी संपर्क साधुन माझे तक्रारीबाबत विचारणा करून त्यांचे पथकासह दुपारपर्यंत कबनुर, ता. हातकणंगले येथे येत असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे मी व कुंभार साहेब



Scanned by TapScanner

फोनवरून ऐकमकांचे संपर्कात होतो. दुपारी 2.15 वा चे सुमारास कुंभार साहेब व त्यांचेकडील पथक असे मला कबनुर ते पटटणकोडोली जाणारे रोडवर भेटले. तेथे कुंभार साहेबांनी माझी ओळख विचारली त्योवळी मी त्यांना माझे नाव गाव सांगीतले. त्यावेळी त्यांनी गाडी रोडचे बाजुला एका मोकळ्या जागी घेतली त्यावेळी तेथे पोनि कुभांर साहेबांनी त्यांची व सोबतचे पंच व पथकातील कर्मचारी यांची ओळख करून दिली. त्यावेळी मला माझे तक्रारीबाबत विचारले तेव्हा मी वरीलप्रमाणे तक्रार सांगुन इचलकरंजी महानगरपालीका येथील लिपीक बाबासाहेब माळी यांनी मला इचलकरंजी महानगरपालीका ऑफीसमध्ये भेटण्यास बोलविले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी पोनि कुंभार साहेबांकडे माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. त्यांनी तो वाचुन पाहिला व माझी तक्रार पंचांना सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर पोनि कुंभार साहेबांनी माझी लेखी तक्रार पंचांना वाचावयास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचाची खात्री झाली. त्यानंतर पोनि कुंभार साहेबांनी व दोन्ही पंचांनी माझे लेखी तक्रारीखाली सहया केल्या. पोनि कुंभार साहेबांनी मला व दोन्ही पंचांना इचलकरंजी महानगरपालीका येथील लिपीक बाबासाहेब माळी हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. लिपीक माळी यांची भेट घेणेकरीता मला पंच नं 1 बाजीराव कांबळे यांचे सोबत पाठविणेचे ठरविले. त्यानंतर त्यांनी वाहनामध्येच त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर कादुन त्यामध्ये नविन मेमरी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण नसल्याची खा○○○त्री करून दिली. मला व पंच श्री कांबळे यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना देवुन परत पथक थांबलेले ठिकाणी येण्यास सांगितले. डिजीटल व्हईस रेकर्डर माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस अडकवुन तो चालू करुन मला व पंच श्री. कांबळे यांना माझे मोटर सायकलवरून लिपीक बाबासाहेब माळी यांची भेट घेणेसाठी माझेकडील मोटर सायकल वरुन इचलकरंजी महानगरपालीकीचे इमारत येथे पाठविले. मी व पंच कांबळे असे इचलकरंजी महानगरपालीका येथे गेलो तेथे महानगरपालीकेचे पाठीमागे पार्कींग मध्ये गाडी पार्क करून पहिल्या मजल्यावरील ऑडीट विभागा गेलो तेथे गेलेनंतर हराळे व सलगर असे ऑडीट विभागातील कर्मचारी होते त्यांना मी लिपीक बाबासाहेब माळी कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी त्यांच इथ बदली झाली आहे ते झेंडा वाटायला जुन्या नगरपरिषदेकडे गेले आहेत असे सांगीतले त्यानंतर आम्ही पाणीपुरठा विभागात गेलो तेथे ही माळी नव्हते म्हणुन मी लिपीक माळी यांचे मोबाईलवर फोन लावला त्यावेळी माळी यांनी मला पाठीमागील पार्कींग गेटला या असे सांगीतले. त्यानंतर आम्ही पार्कींग गेट ला येवुन थांबलो. थोडयावेळाने लिपीक माळी व प्रपर्टी सुपरवायझर श्रीकांत पाटील असे मोटर सायकलने आले. त्यावेळी लिपीक माळी यांनी मला जुन्या नगरपालीकेकडे चला असे म्हणाले आम्ही थोडे पुढे गेलेनंतर थांबलो त्यावेळी माझेत व लिपीक माळी यांचेत मी केलेल्या अतिक्रमण कारवाईबाबत बोलणे झाले. त्यावेळी त्यांनी पंचाकडे बघुन हे कोण आहेत असे विचारले त्यावेळी मी त्यांना ते आमचे नातेवाईक आहेत म्हणुन सांगीतले. त्यांनतर लिपीक माळी मला काय झाले अडचण आहे काय राहुदे माझ काय नाय असे म्हणाले त्यावेळी मी तस काही नाही खर असे म्हणालो त्यावेळी माळी यांनी प्रब्लेम आला असला तर राहुदे असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना नाय नाय तस काय नाय असे म्हणालो त्यावेळी माळी यांनी मला पुन्हा काय अडचण असे विचारले त्यावेळी मी त्यांना किती रूपये हे करायचे असे म्हणालो त्यावेळी त्यांनी द्या की हजार रूपये हजार रूपये द्या काय जास्त घेत नाही असे म्हणाले त्यावेळी मी हजार रूपये असे म्हणालो त्यावेळी त्यांनी इच्छा नसेल देवु नका असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना नाय तस कस असे म्हणालो. त्यानंतर माझेत व लिपीक माळी यांचेत मेडीकल बिला संदर्भात बोलने झाले.त्यानंतर मी त्यांना घराला जावुन येवु काय नगरपालीकेत असे म्हणालो त्यावेळी त्यांनी या की फोन करा संध्याकाळी असे म्हणाले त्यावेळी माळी यांनी मला फोन करा संध्याकाळी असे म्हणाले त्यानंतर मी होय म्हणालो. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन आलो. त्यानंतर तेथुन निघुन मी व पंच कांबळे असे मोटर सायकलवरुन पोनि कुंभार साहेब थांबले ठिकाणी परत आलो. पोनि कुभांर साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हईस रेकर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर माझेकडे विचारणा केली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर पोनि कुंभार साहेबांनी पंच कांबळे, माझेकडे विचारपुस करून व डिजीटल व्हईस रेकर्डरमधील ध्वनीमुद्रीत बोलणे ऐकुण लिपीक माळी हे माझेकडे माझे आईचे मेडीकल बिलाचीचे अनुषंगाने 1000/- रू. लाचेची मागणी करून ती घेवुन येण्यास सांगीतल्याची खात्री करून घेतली. पोनि कुंभार साहेबांनी मला व पंचाना सापळा पुर्व कारवाई सुरु करीत असलेचे सांगितले. त्यावेळी मला पोनि कुभांर साहेबांनी लिपीक बाबासाहेब माळी यांना देणेची लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले 500/- रु. दराच्या 2 नोटा मिळून रु.1000/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. तेव्हा त्यांचेकडील स्टाफमधील पो.ना.घोसाळकर यांनी नोटांचे नंबर्स लिहून घेतले. त्यानंतर पोनि कुंभार साहेबानी मला आणि पंचांना अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे महत्व सांगुन गुणधर्म सांगितले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना गाडीतील सिटवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून पो.ना. घोसाळकर यांनी अँन्थ्रसिन पावडर लावून घेतली व गाडीमध्ये अंधार करुन नोटांची अल्ट्राव्हायोलेट बटरीचे सहायाने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यानंतर पोना घोसाळकर यांनी ती लाच रक्कम रु.1000/- माझे शर्टचे डाव्या बाजुचे खिषात घडी करून ठेवली. त्यानंतर पोनि कुंभार साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड घालून मला, दोन्ही पंच व त्यांचा स्टाफ यांना सापळयाचे अनुषंगाने सुचना दिल्या. पोनि कुंभार साहेबांनी मला लिपीक बाबासाहेब माळी यांनी लाच रक्कम घेवून कोठे बोलाविले आहे असे विचारले असता त्यांना मी लिपीक बाबासाहेब माळी यांनी पैसे घेवुन जुने इचलकरंजी नगरपरिषदचे इमारतीमध्ये येणेस सांगीतले असल्याचे सांगितले. त्यावेळी कुभांर साहेबांनी मला लिपीक बाबासाहेब माळी यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर माझा चष्मा काढून माझे डोक्यावरून माझा डावा हात फिरवणेचा इषारा करणेचा आहे असे सांगीतले. त्यानंतर पोनि कुंभार साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर चालु करुन तो माझे गळयात अडकविला. तेथून मला व पंच बाजीराव कांबळे यांना जुन्या इचलकरंजी नगरपरिषेदेच्या इमारतीमध्ये लिपीक बाबासाहेब माळी यांची भेट घेण्यासाठी लाच रक्कमेस माझे मोटर सायकलवरून पाठविले व कुंभार साहेब व त्यांचा स्टाफ आणि पंच नं. 2 श्री भरत पाटील असे त्यांचेकडील सरकारी गाडीने आमचे पाठोपाठ आले. मी माझेकडील मोटर सायकल इचलकरंजी नगरपरिषदेचे इमारतीचे खाली पार्कींग करून मी व पंच नगरपरिषेदचे पहिल्या मजल्यावर गेलो. त्यावेळी पोनि कुंभार साहेब व त्यांचा स्टाफ पंच नंबर 2 पाटील हे ही कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील आजुबाजुला थांबुन राहीले. पहिल्या मजल्यावरील लालबहादुर शास्त्री सभागृहाचे बाजुला लिपीक माळी मला भेटले त्यावेळी मी त्यांना आईच मेडीकलच केलासा त्याबददल अभारी आहे असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी हा देतासा इथ असे म्हणुन या इकडे असे म्हणुन तो माणुस एक तुम्ही कोण संग घेवुन फिरायला लागला आहे असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना तो पाहुणा आहे असे म्हणालो त्यावेळी माळी म्हणाले मला वाटले कोण अन्टी करप्शनचा हाय, द्या की काय द्यायच हाय ते द्या मला पैसे नाहीत ओ तुम्हाला दाखवु काय मजे परस्थिती हे बघा की एक रूपश सुध्दा नाही म्हणुन मी तुम्हाला असे म्हणुन पाकीट उघडुन दाखविले. त्यावेळी मी त्यांना आईच्या मेडीकलच केलाय तेज्याबददल आभारी आहे तुमचा हा तुम्ही मागीतल्याप्रमाणे असे म्हणुन माझे शर्टचे खिशातील लाच रक्कम लिपीक माळी यांना काढुन दिली व ती लाच रक्कम लिपीक माळी यांनी उजव्या हाताने स्विकारून त्यांचे पाकीटात ठेवली. त्यावेळी मी त्यांना मोजुन घ्या असे म्हणालो त्यावेळी आम्ही बोलत असताना मी चष्मा काढुन माझे डोक्यावरून माझा डावा हात फिरवुन लिपीक माळी यांनी लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजित इशारा केला. तेव्हा पोनि कुंभार साहेब व त्यांचे सोबतचा स्टाफ येवु◌ुन लिपीक माळी यांना पकडले. त्यावेळी माझे गळयातील डिजीटल व्हाईस रेकर्डर बंद केला. त्यानंतर लिपीक माळी यांचेकडुन पंच साक्षीदार यांचेसमक्ष पोनि कुंभार साहेब यांनी लाच रक्कम रु.1000/- ताब्यात घेतली आ इथुन पुढील फीर्याद मुळ फीर्यादीप्रमाणे आहे.



Scanned by TapScanner

13. Action (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): IMTIYASP AMEERHAMJA PATEL
Rank (पद): PC (Police Constable)
No.(क्र.): 88083 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

ABmagne

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
इचलकरंजी पोलीस ठाणे
**Name** (नाव): RAJU ANANDA TAHSILDAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMH50695



Scanned by TapScanner